RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ६, अंक १२९] सोमवार, डिसेंबर २१, २०२०/अग्रहायण ३०, शके १९४२ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३१६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ डिसेंबर २०२०

**आदेश**

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम.**

क्रमांक मुद्रांक-२०२०/प्र.क्र.१३६/म-१(धोरण).— महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा क्र.६०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे दिनांक २९ ऑगस्ट २०२० रोजीच्या शासकीय आदेश महसूल व वन विभाग, क्र. मुद्रांक-२०२०/प्र.क्र.१३६/म-१ (धोरण) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त आदेश " असा करण्यात आला आहे) मध्ये लोकहितास्तव तथा लोकहितार्थ, सुधारणा करणे आवश्यक असल्याची शासनाची खात्री पटल्यामुळे पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

उक्त आदेशामध्ये,—

(अ) " अनुच्छेद २५ च्या खंड (बी) " या शब्द/अंक आणि अक्षरांनंतर, " किंवा अनुच्छेद ३६ च्या खंड (चार) " हे शब्द/अंक आणि अक्षरे समाविष्ट करण्यात येत आहेत ;

(ब) " विक्रीकरारपत्राच्या " या शब्द आणि अक्षरांनंतर, " किंवा भाडेपट्टा " हे शब्द आणि अक्षरे समाविष्ट करण्यात येत आहेत ;

(क) " कोणत्याही स्थावर मिळकतीबाबतच्या " या शब्द आणि अक्षरांनंतर, पुढीलप्रमाणे " पुढील स्पष्टीकरण आणि अटी तथा शर्तीच्या अधिन राहुन " हे शब्द आणि अक्षरे समाविष्ट करण्यात येत आहेत :—

**अटी तथा शर्ती.—**

(१) कोणत्याही प्रकारच्या वापरातील कोणत्याही स्थावर मिळकतीबाबतच्या प्रकल्प सूचकाने तथा प्रवर्तकाने किंवा कोणत्याही खरेदीकर्त्यांने किंवा भाडेपट्टयाने घेणाऱ्याने किंवा भाडेपट्टयाने देणाऱ्याने किंवा कोणत्याही प्रकल्प सुचक तथा प्रवर्तकाच्या कोणत्याही दुय्यम कंपनीने महाराष्ट्र शासनाच्या इतर कोणत्याही धोरणाखाली किंवा आदेशाखाली मुद्रांक शुल्क कपातीचा लाभ घेतला असल्यास ते या आदेशाखाली मुद्रांक शुल्कात सवलत किंवा सूट मिळण्यास हक्कदार असणार नाहीत.

(२) **महाराष्ट्र शासन राजपत्रात** हा आदेश अधिसूचित झाल्याच्या दिनांकापूर्वी, कोणत्याही प्रकारच्या वापरातील कोणत्याही स्थावर मिळकतीबाबतच्या प्रकल्प सूचकाने तथा प्रवर्तकाने किंवा कोणत्याही खरेदीकर्त्यांने किंवा भाडेपट्टयाने घेणाऱ्याने किंवा भाडेपट्टयाने देणाऱ्याने किंवा कोणत्याही प्रकल्प सुचक तथा प्रवर्तकाच्या कोणत्याही दुय्यम कंपनीने, यथोचित किंवा संपूर्ण मुद्रांक शुल्क भरले असेल तर, त्याबाबत कोणताही परतावा दिला जाणार नाही.

**स्पष्टीकरण.—**

(१) या आदेशांन्वये देण्यात येणाऱ्या मुद्रांक शुल्क सवलत तथा सुटीचा लाभ हा केवळ एकोणतीस वर्षाहुन अधिक कालावधीकरिता अथवा शाश्वत कालावधीकरिता निष्पादित होणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या स्थावर मिळकतीबाबतच्या भाडेपट्टयाच्या दस्तांनाच देय राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्रितमकुमार व. जावळे,**

शासनाचे कार्यासन अधिकारी.

## REVENUE AND FOREST DEPARTMENT

Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 21st December 2020

### Order

MAHARASHTRA STAMP ACT.

No.Mudrank-2020/CR-136/M-1 (Policy).— In exercise of the powers conferred by clause *(a)* of Section 9 of the Maharashtra Stamp Act (LX of 1958) (herein after referred to as " the said Act "), the Government of Maharashtra, being satisfied that it is necessary so to do in the public interest, hereby amends the Government Order, Revenue and Forests Department, No. Mudrank-2020/ C.R.No.136/M-1(Policy), dated the 29th August 2020 (herein after referred to as " the said Order "), as follows, namely :—

In the said Order,—

(*a*) after the words/ figures and letters, " clause (b) of Article 25 ", the words/ figures and letters, " or clause (iv) of Article 36 ", shall be inserted;

(*b*) after the words and letters, " Agreement to sale ", the words and letters, " or lease ", shall be inserted;

(*c*) after the words and figures " any immovable property.", the following shall be added, namely :—

" subject to the following conditions and explanation, namely :—

*Conditions.*—

(1) The project proponent/s or purchaser or lessor or lessee of any immovable property under any user or any subsidiary company of any project proponent/s which has availed the remission or reduction as per any other order or policy of the Government of Maharashtra shall not be entitled for remission or reduction of stamp duty under this order.

(2) No refund shall be granted where full or proper stamp duty has already been paid by any of the project proponent/s or purchaser or lessor or lessee of any immovable property under any user or any subsidiary company of any project proponent/s, prior to the date of publication of this order in the *Maharashtra Government Gazette.*

*Explanation.*—

(1) The benefit of stamp duty reduction provided by this Order shall apply only to the instrument or document/s of lease of any immovable property being executed for the period exceeding twenty-nine years or in perpetuity.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRITAMKUMAR V. JAWALE
Desk Officer to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.